# वित्त विभाग, जिल्हा परिषद पालघर

**मुख्य प्रशासकीय इमारत, नवीन विक्रीकर कार्यालय, बिडको रस्ता, नवली, ता.जि.पालघर**
**दुरध्वनी क्र. ०२५२५-२९७००३** **e-mail : cafozp.palghar@gmail.com**

**प्रेषण प्रमाणपत्र घेऊन**

जा.क्र.पाजिप/अर्थ/वित्त समिती/वशी/200
वित्त विभाग, जि.प. पालघर
दिनांक : 23/11 /२०१७.

**नोटीस**

या पत्रान्वये पालघर जिल्हा परिषद अर्थ समितीचे सन्माननीय सदस्य मा.श्री./श्रीम.____________________ मुक्काम__________ पोस्ट__________ तालुका__________ जिल्हा पालघर यांस कळविण्यांत येते की अर्थ समितीची सभा **मंगलवार दिनांक ०५.१२.२०१७ रोजी स.११.३०** वाजता **संकुल सभागृह पंचायत समिती पालघर** येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेस हजर राहणेस विनंती आहे.

**टिप :-** गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा त्याच ठिकाणी अर्ध्यातासाने सभा घेतली जाईल.

**मा.सभापती अर्थ समिती यांचे मान्यतेनुसार.**

**सही/-**
**मा. सभापती अर्थ समिती,**
**जिल्हा परिषद पालघर**

**विषय पत्रिका :**

विषय क्र. १ (अ) - मागील अर्थ समिती सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देणेबाबत.
(ब) - मागील अर्थ समिती सभेत मंजूर ठरावांच्या अंमलबजावणीबाबत.

विषय क्र. २. जिल्हा परिषद पालघरच्या माहे सप्टेंबर २०१७ च्या मासिक जमा/खर्चाच्या तक्त्यास मंजूरी देवून स्थायी समितीच्या मंजूरीसाठी शिफारस करणेबाबत.

विषय क्र. ३. वित्त विभाग, जिल्हा परिषद पालघर कडील माहे एप्रिल २०१७ ते जुलै २०१७ अखेरच्या लेखाविषयक नोंदवहयांना मंजूरी मिळणेबाबत.

विषय क्र. ४. वित्त विभागाच्या स्थानिक निधी लेखा कार्यालयाकडील सन २०१५-१६ च्या लेखापरीक्षण अहवालाच्या प्रथम पुर्तता अनुपालन अहवालास मान्यता देण्याबाबत.

विषय क्र. ५. मा.सभापती यांचे परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय.

**सचिव अर्थ समिती तथा**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

**प्रत माहितीसाठी सादर.**

१.मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद पालघर.
२.मा.उपाध्यक्ष, जिल्हा परिषद पालघर.
३.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर.

# अर्थ समिती सभा दिनांक ०८.११.२०१७

## इतिवृत्त भाग -१

| अ.क्रं. | सभेस उपस्थित पदाधिकारी | सभेस उपस्थित अधिकारी व कर्मचारी |
|---|---|---|
| १) | **मा.श्री.निलेश रमेश गंधे**<br>**सभापती, अर्थ समिती, जि.प.पालघर** | १)श्री.संजय पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी.<br>२) श्री. किरण भिलारे, सचिव तथा उप मु.ले.व वि.अ., जि.प.पालघर |
| २) | मा.श्री.रामा जानु ठाकरे, सदस्य | ३) श्री. प्र. म. वैवुडे, लेखाधिकारी (१),वित्त विभाग |
| ३) | मा.श्रीम.रंजना किशोर संखे, सदस्य | ४) श्री.एस.आर.वंजारी, स.ले.अ, वित्त विभाग |
| ४) | मा.श्री. सुरेश बाबु कोरडा, सदस्य | ५) श्री.आर.वाय.मौळे, स.ले.अ, समाजकल्याण विभाग. |
| ५) | मा. श्रीम.पार्वती चंद्रकांत भुसारा, सदस्य | ६)श्री.जे.बी.वानरे, स.ले.अ, पाटबंधारे विभाग. |
| ६) | मा.श्री.सुरेश ठक्या तरे, सदस्य | ७) श्री दिपक तरे क.ले.अ, शिक्षण विभाग |
| ७) | मा.श्री. प्रदिप महादेव वाघ, सदस्य | ८) श्रीम. वैशाली गायकवाड व.स.ले. वित्त विभाग |
| ८) | मा. श्रीम.कल्याणी किशोर तरे, सदस्य | |
| ९) | मा. श्री.किशोर बारकू बरड, सदस्य | |

माहे नोव्हेंबर २०१७ ची अर्थ समिती सभा बुधवार, दिनांक ०८.११.२०१७ रोजी, दु .४.०० वाजता मा.सभापती, अर्थ समिती तथा उपाध्यक्ष, जि.प.पालघर यांचे दालनात आयोजती करणेत आली होती. त्यानुसार दिनांक ०८.११.२०१७ रोजी, दु .४.०० वाजता सभा सुरू करण्यात आली. प्रथम मा.श्री.निलेश रमेश गंधे सभापती अर्थ समिती, जि.प.पालघर यांनी उपस्थित सर्व सन्माननीय अर्थ समिती सदस्यांचे स्वागत करून समिती सचिव तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.पालघर यांना सभेचे कामकाज सुरु करणेस सांगितले.

त्यानुसार सभेचे सचिव श्री.संजय पतंगे, तथा मुख्य लेखा व व वित्त अधिकारी, जि.प.पालघर यांनी मा.सभापती यांच्या परवानगीने सभेचे विषय निहाय कामकाज सुरु केले.

**विषय क्रं. १.**

**(अ) मागिल अर्थ समिती सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देणेबाबत.**

अर्थ समिती सभा दिनांक १३.१०.२०१७ च्या सभेचे इतिवृत्त सर्व सन्माननिय सभासदांना देण्यात आलेले आहे, सदरच्या इतिवृत्तात काही नोंदी घ्यावयाच्या राहिल्या असतील तर तसे सुचित करावे असे माननीय सभापती महोदयांनी सभागृहात सांगितले. याप्रमाणे दिनांक १३.१०.२०१७ च्या इतिवृतामध्ये सन्मा.सदस्यांच्या सुचना नसल्याने इतिवृतास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

**(ब) मागील अर्थ समिती सभेत मंजूर ठरावांच्या अमंलबजावणी बाबत.**

दिनांक १३.१०.२०१७ च्या अर्थ समिती सभेमध्ये मंजूर झालेल्या ठरावाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर माहीती अर्थ समितीचे सचिव यांनी सभागृहात दिली व त्यास मा. सदस्यांनी सहमती दर्शविली.

**विषय क्रं. २.**

**जिल्हा परिषद पालघरचा माहे ऑगस्ट २०१७ च्या मासिक जमा व खर्चाच्या तक्त्यास मंजूरी देवून स्थायी समितीच्या मंजूरीसाठी शिफारस करणेबाबत.**

पालघर जिल्हा परिषदेचे माहे ऑगस्ट २०१७ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चाचे तक्ते सन्माननीय सदस्यांना सादर करणेत आले. अर्थ समितीचे सचिव श्री.संजय पतंगे, तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सदर जमा खर्च तक्यांमधील योजनांबाबत लेखाशिर्ष निहाय सविस्तर जमा व खर्चाची माहिती सभागृहास दिली.

सन्माननीय सदस्यांनी यावर सविस्तर चर्चा करून माहे ऑगस्ट २०१७ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चास सभागृहाने सर्वानुमते मान्यता दिली व मंजुरीसाठी स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस करण्यात आली.

**विषय क्रं.३.**

**वित्त विभाग, जि.प.पालघर कडील माहे जानेवारी २०१७ ते मार्च २०१७ अखेरच्या लेखाविषयक नोंदवहयांना मंजूरी मिळणेबाबत.**

ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन परिपत्रक दिनांक १५.०३.१९८४ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील तरतुदींनुसार वित्त विभागातील लेखाविषयक नोंदवहया पूर्ण व बिनचूक ठेवल्या असलेबाबतचा त्रैमासिक अहवाल वित्त समिती सभेपुढे ठेवणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

या अनुषंगाने सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता वित्त विभाग, जि.प.पालघर येथे माहे जानेवारी २०१७ ते मार्च २०१७ अखेर पूर्ण व बिनचूक ठेवण्यात आलेल्या खालील तक्त्यात नमुद लेखाविषयक नोंदवहया समितीच्या अवलोकनार्थ सादर करणेत आल्या.

| अ. क्र. | लेखाविषयक नोंदवहीचा तपशिल | अ. क्र. | लेखाविषयक नोंदवहीचा तपशिल |
|---|---|---|---|
| १. | रोख रोजकिर्द नमुना नं.४ | ८. | वित्त विभाग मासिक जमा व खर्चाचा वर्गीकृत गोषवारा नोंदवही नमुना नं.१९ |
| २. | रोजकिर्द नमुना नं.७ | ९. | अनामत नोंदवही नमुना नं.७१ |
| ३. | धनादेश नोंदवही नमुना नं.११ | १०. | अग्रिम नोंदवही नमुना नं.७९ |
| ४. | देयक नोंदवही नमुना नं.१२ | ११. | अनुदान नोंदवही नमुना नं.९० |
| ५. | जमा नोंदवही नमुना नं.१३ | १२. | साठा नोंदवही नमुना नं.३३ |
| ६. | खर्च नोंदवही नमुना नं.१४ | १३. | पावती पुस्तक नोंदवही नमुना नं.१० |
| ७. | खाते बदल नोंदवही नमुना नं.१७ | १४. | गुंतवणूक नोंदवही नमुना नं.८४ |

सदर लेखाविषयक नोंदवहयांचे अवलोकन करून अर्थ समितीने त्यांस मंजूरी दिली.

**विषय क्रं. ४.**

**मा.सभापती यांचे परवानगीने येणारे आयत्यावेळचे विषय.**

मा.सभापती यांच्या परवानगीने समाजकल्याण विभागाकडील पुढील विषय समिती पुढे सादर करणेत आला.

**विषय- समाजकल्याण विभागाकडील जिल्हा परिषद अर्थसंकल्प सन २०१७-१८ अंतर्गत योजनांकरीता निधीचे पुनर्विनियोजन करणेबाबत.**

दिनांक १३.१०.२०१७ रोजीच्या समाजकल्याण समितीने समाजकल्याण विभागाकडील सन २०१७-१८ च्या जिल्हा परिषद अर्थसंकल्पातील खालील नमुद योजनांतर्गत निधीचे पुनर्विनियोजन करणेबाबत मंजूरी दिली असून सदर पुनर्विनियोजनास आगामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची घेणेसाठी अर्थ समितीची शिफारस होणेबाबत विषय सादर करणेत येत आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | मुळ अंदाजपत्रकीय तरतुद | प्रस्तावित पुनर्विनियोजन | | प्रस्तावित सुधारीत तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | कमी लागणारी तरतुद | आवश्यक जादा तरतुद | |
| १. | मागासवर्गीयांना घर दुरुस्तीसाठी अर्थसहाय्य | ० | ० | २०,००,००० | २०,००,००० |
| २ | ५ वी ते ९ वी च्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकली पुरविणे | ० | ० | १५,००,००० | १५,००,००० |
| ३. | मागासवर्गीय योजना राबविणेसाठी सादिल खर्च | ५०,००० | ० | १,००,००० | १,५०,००० |
| ४. | मागासवर्गीय लाभार्थ्यांना बँजो व डि.जे. पुरविणे | ० | ० | १,३२,००,००० | १,३२,००,००० |
| ५. | जि.प. मालकीच्या अनुदानीत वस्तीगहांच्या इमारतींची देखभाल दुरुस्ती | ५,००,००० | ० | ८,००,००० | १३,००,००० |
| ६. | मागासवर्गीय महिलांना स्वंयरोजगार चालनासाठी वाहन चालक प्रशिक्षण व परवाना शुल्क अनुदान | १५,००,००० | १५,००,००० | ० | ० |
| ७. | मागासवर्गीय कुष्टरोगींना पुनर्वसनासाठी अर्थसहाय्य | १५,००,००० | १५,००,००० | ० | ० |
| ८. | मागासवर्गीय वस्तीतील मुलींची सहल आयोजन करणे | १०,००,००० | १०,००,००० | ० | ० |
| ९. | आंतरजातीय सामुहिक विवाह मेळावे आयोजन करणे | ४५,००,००० | ४५,००,००० | ० | ० |
| १०. | मागासवर्गीय वस्तीमधील जि. प. शाळा क्रिडांगण विकास करणे | २५,००,००० | २५,००,००० | ० | ० |
| ११. | मागासवर्गीय लाभार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य | ९१,००,००० | ६६,००,००० | ० | २५,००,००० |
| १२. | मान्यताप्राप्त विशेष मुलांच्या अनुदानित विनाअनुदानित शाळेतील मुलांनाकरीता आवश्यक सोयी सुविधा पुरविणे | १०,००,००० | ० | ९,५०,००० | १९,५०,००० |
| १३. | अपंग कल्याणकारी योजनांचा प्रचार व प्रसार करणे यासाठी शिबिर आयोजन व अपंगत्व प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे | ० | ० | ५०,००० | ५०,००० |
| १४. | अपंग लाभार्थ्यांचे सामुहिक विवाह मेळावे आयोजन करणे | १०,००,००० | १०,००,००० | ० | ० |
| | एकूण | | १,८६,००,००० | १,८६,००,००० | |

सदर विषयाबाबत सभेत चर्चा होवून विभागाने विनंती केलेल्या निधीच्या पुनर्विनियोजनास सभेने मंजूरी देवून सदर पुनर्विनियोजनाचा प्रस्ताव आगामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेपुढे मंजूरी करीता सादर करणेस शिफारस करणेत आली.

सभेपुढे चर्चेकरीता अन्य विषय नसल्याने सचिव श्री. एस.पी.पतंगे, तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी मा.सभापती यांचे परवानगीने सभेस उपस्थित अर्थ समिती सदस्य, विभाग प्रमुख व त्यांचे प्रती निधी यांचे आभार मानून सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**सचिव अर्थ समिती तथा**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

**मा. सभापती,**
**अर्थ समिती तथा उपाध्यक्ष**
**जिल्हा परिषद पालघर**

# अर्थ समिती सभा दिनांक ०८.११.२०१७
## इतिवृत्त भाग -२

| सभेची तारीख व वेळ | ठरावाचा विषय | प्रस्तावाची रचना | प्रस्ताव सूचक व अनुमोदक | प्रस्ताव कोणताही असल्यास | | दुरूस्ती मतदाना नंतरचा ठराव | ठराव क्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बाजूने | विरुध्द | | |
| बुधवार दिनांक ०८.११.२०१७ रोजी दु. ४.०० वाजता | विषय क्र.१ (अ) मागिल सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे. | अर्थ समिती सभा दिनांक १३.१०.२०१७ च्या सभेचे इतिवृत्त सर्व सन्माननिय सभासदांना देण्यात आलेले आहे. सदरच्या इतिवृत्तात काही नोंदी घ्यावयाच्या राहिल्या असतील तर तसे सुचित करावे असे माननीय सभापती महोदयांनी सुचविले दिनांक १३.१०.२०१७ च्या इतिवृत्तामध्ये दुरूस्ती सन्मा.सदस्यांच्या सुचना नसल्यामुळे इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे. | मा.श्री.रामा जानु ठाकरे, सदस्या.<br>मा.श्रीम. रंजना किशोर संखे , सदस्या. | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | -- | ७४ |
| | विषय क्र.१ (ब) मागील ठरावाच्या अमंलबजावणी बाबत. | दिनांक १३.१०.२०१७ च्या अर्थ समिती सभेमध्ये मंजूर झालेल्या ठरावाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर माहीती अर्थ समितीचे सचीव यांनी सभागृहात दिली व त्यास मा.सदस्यांनी सहमती दर्शविल | मा.श्री.प्रदिप महादेव वाघ, सदस्या .<br>मा.श्रीम. पार्वती चंद्रकांत भूसारा, सदस्या | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | -- | |

| सभेची तारीख व वेळ | ठरावाचा विषय | प्रस्तावाची रचना | प्रस्ताव सूचक व अनुमोदक | प्रस्ताव कोणताही असल्यास | | दुरूस्ती मतदाना नंतरचा ठराव | ठराव क्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बाजूने | विरुध्द | | |
| | विषय क्र.२<br>जिल्हा परिषद पालघरचा माहे ऑगस्ट २००१७ च्या मासिक जमा व खर्चाच्या तक्त्यास मंजूरी देवून स्थायी समितीच्या मंजूरीसाठी शिफारस करणेबाबत. | पालघर जिल्हा परिषदेचे माहे ऑगस्ट २०१७ च्या हस्तांतरित,अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चाचे तक्ते सन्माननीय सदस्यांना देण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी यावर सविस्तर चर्चा करुन माहे ऑगस्ट २०१७ च्या हस्तांतरित,अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे व मंजुरीसाठी स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस देण्यात येत आहे. | मा.श्री.रामा जानु ठाकरे, सदस्या.<br><br>मा.श्री. सुरेश बाबू कोरडा, सदस्या | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | -- | ७५ |
| | विषय क्र.३<br>वित्त विभाग,जिल्हा परिषद पालघर कडील माहे जानेवरी २०१७ व मार्च २०१७ अखेरच्या लेखाविषयक नोंदवहयांना मंजूरी मिळणेबाबत. | ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन परिपत्रक दिनांक १५.०३.१९८४ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील तरतूदींनुसार वित्त विभागातील लेखाविषयक नोंदवहया पूर्ण व बिनचूक ठेवल्या असलेबाबतचा त्रेमासिक अहवाल वित्त समिती सभेपुढे ठेवणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. या अनुषंगाने सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता वित्त विभाग,जिल्हा परिषद पालघर कडील माहे जानेवरी २०१७ व मार्च २०१७ अखेर पूर्ण व बिनचूक ठेवण्यात आलेल्या लेखाविषयक नोंदवहया समितीच्या अवलोकनार्थ सादर करणेत आल्या सदर लेखाविषयक नोंदवहयांचे अवलोकन करुन अर्थ समितीने त्यास मंजूरी दिली | मा.श्रीम कल्याणी किशोर तरे , सदस्या<br><br>मा.श्रीम. रंजना किशोर संखे , सदस्या. | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | -- | ७६ |

| सभेची तारीख व वेळ | ठरावाचा विषय | प्रस्तावाची रचना | प्रस्ताव सूचक व अनुमोदक | प्रस्ताव कोणताही असल्यास बाजूने | विरुध्द | दुरूस्ती मतदाना नंतरचा ठराव | ठराव क्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **विषय क्र.४** **समाजकल्याण विभागाकडील जिला परिषद अर्थसंकल्प सन २०१७-१८ अंतर्गत योजनांकरीता निधीचे पुर्नविनियोज करणेबाबत.** | दिनांक १३.१०.२०१७ रोजीच्या समाजकल्याण समितीच्या शिफारसीनुसार समाजकल्याण विभागाकडील सन २०१७-१८ च्या जिल्हा परिषद अर्थसंकल्पातील खालील नमुद योजनांतर्गत निधीचे पुर्नविनियोजनास ही अर्थ समिती सभा मान्याता देत असून सदर पुर्नविनियोजन प्रस्ताव आगामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस शिफारस करीत आहे. | मा.श्रीम कल्याणी किशोर तरे , सदस्या<br><br>मा.श्रीम. पार्वती चंद्रकांत भूसारा, सदस्या | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | -- | ७७ |

**सचिव अर्थ समिती**
**तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

**मा.सभापती**
**अर्थ समिती तथा उपाध्यक्ष,**
**जिल्हा परिषद पालघर**